# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपुर शहराचा विस्तार झाला असल्याने लोकसंख्येत झपाटयाने वाढ
**{अग्निशमन विभाग}** झाली आहे. त्याचबरोबर शहर/नागपुर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये येणाऱ्या परिक्षेत्रातील ९० मी. उंचीपर्यंतचे इमारत बांधकामातील अग्निशमन उपाययोजना उभारण्यासंबंधात नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यास विभागाकडे अनेक प्रकरणे येत असतात. नियमानुसार अशा प्रकरणांमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारण्याचे सुचवुन प्रथम नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित केले जातात.

उंचीचे इमारतीतील अग्निशमन व विमोचन कार्य करण्यास विभागाकडे ४२ मी. टर्न टेबल लॅडर व ३२ मी. उंच हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म उपलब्ध आहे. यापेक्षा उंचीचे इमारतीतील अग्निशमनाचे कार्य करण्यास विभागाकडे हॅड्रॉलिक प्लेटफॉम मशीन उपलब्ध नसल्याने या साहित्याची निकडता लक्षात घेता ७० मी. उंच हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म खरेदी व ५ वर्ष कालावधीचे सर्वसमावेशक दुरुस्ती व देखभाल कार्याची प्राकलन राशी रु. २१.९३ कोटी (सर्व करांसहित) प्रमाणे ई-निविदा मागण्यास मा. आयुक्त याची दि. ०५/०७/२०२२ रोजीची मान्यता आहे.

प्रस्तावित विषय विचारात घेवून ७० मी. उंच हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म खरेदी व ५ वर्ष कालावधीचे सर्वसमावेशक दुरुस्ती व देखभाल कार्याची प्राकलन राशी रु. २१.९३ कोटी (सर्व करांसहित) प्रमाणे ई-निविदा मागविण्याचा विषय मान्यतेस सादर.
टीप :- सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- ३५/मनपा/प्रशासक** **दिनांक :- १३/०७/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रमुख अग्निशमन अधिकारी, अग्निशमन व आणिबाणी सेवा विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपुर शहराचा विस्तार झाला असल्याने लोकसंख्येत झपाटयाने वाढ झाली आहे. त्याचबरोबर शहर/नागपुर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये येणाऱ्या परिक्षेत्रातील ९० मी. उंचीपर्यंतचे इमारत बांधकामातील अग्निशमन उपाययोजना उभारण्यासंबंधात नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यास विभागाकडे अनेक प्रकरणे येत असतात. नियमानुसार अशा प्रकरणांमध्ये अग्निशमन यंत्रणा उभारण्याचे सुचवुन प्रथम नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित केले जातात.

उंचीचे इमारतीतील अग्निशमन व विमोचन कार्य करण्यास विभागाकडे ४२ मी. टर्न टेबल लॅडर व ३२ मी. उंच हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म उपलब्ध आहे. यापेक्षा उंचीचे इमारतीतील अग्निशमनाचे कार्य करण्यास विभागाकडे हॅड्रॉलिक प्लेटफॉम मशीन उपलब्ध नसल्याने या साहित्याची निकडता लक्षात घेता ७० मी. उंच हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म खरेदी व ५ वर्ष कालावधीचे सर्वसमावेशक दुरुस्ती व देखभाल कार्याची प्राकलन राशी रु. २१.९३ कोटी (सर्व करांसहित) प्रमाणे ई-निविदा मागण्यास मा. आयुक्त याची दि. ०५/०७/२०२२ रोजीची मान्यता आहे.

प्रस्तावित विषय विचारात घेवून ७० मी. उंच हॅड्रॉलिक प्लेटफॉर्म खरेदी व ५ वर्ष कालावधीचे सर्वसमावेशक दुरुस्ती व देखभाल कार्याची प्राकलन राशी रु. २१.९३ कोटी (सर्व करांसहित) प्रमाणे ई-निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**